# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : २३ ■ एप्रिल–मे २०२५ ■ पाने : ८


# विद्युत वाहन धोरणामुळे महावितरणची जबाबदारी वाढली

**मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाने महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला नवीन विद्युत वाहन धोरण २०२५ मंजूर केले. हे धोरण पाच वर्षे लागू राहील. इलेक्ट्रिक व्हेईकल्स अर्थात विद्युत वाहनांचे उत्पादन आणि विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच विद्युत वाहनांच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी या धोरणात राज्य सरकारने १९९३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. संपूर्ण जगभर विद्युत वाहनांचा वापर वाढत असताना महाराष्ट्र राज्यालाही जगासोबत ठेवण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने हा महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

नव्या विद्युत वाहन धोरणामध्ये विजेवर चालणाऱ्या दुचाकी, तीन चाकी, खासगी प्रवासी वाहने, राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस, महानगरपालिकांच्या बसेस आणि खासगी बसेसच्या खरेदीसाठी दहा टक्के अनुदान देण्यात येईल. विजेवर चालणाऱ्या मालवाहू तीनचाकी किंवा चारचाकी वाहनांना तसेच ट्रॅक्टर्स व शेती उपकरणांना पंधरा टक्के अनुदान देण्यात येईल.

या धोरणानुसार राज्यात विकल्या जाणाऱ्या व नोंद होणाऱ्या सर्व विद्युत वाहनांना मोटर वाहन करापासून आणि नोंदणी शुल्कापासून सूट मिळेल. तसेच मुंबई पुणे एक्सप्रेस मार्ग, मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू येथे विजेवर चालणारी प्रवासी चारचाकी वाहने तसेच बसेससाठी टोल माफ असेल.

### महावितरणची जबाबदारी वाढली

महाराष्ट्र सरकारच्या नव्या विद्युत वाहन धोरणामध्ये एक महत्त्वाची तरतूद आहे. राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग स्टेशन उभारणे प्रस्तावित आहे. त्यामुळे महामार्गावर विद्युत वाहन चालविणाऱ्यांमध्ये गाडीच्या बॅटरीचे चार्जिंग संपण्याची चिंता दूर होईल.

विद्युत वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या बाबतीत महावितरण ही राज्याची नोडल एजन्सी आहे. राज्यात कोणतेही सार्वजनिक आणि खासगी चार्जिंग स्टेशन उभारण्यात महावितरण मदत करते. आतापर्यंत महावितरणच्या सहाय्याने राज्यात ३७२८ खासगी आणि सार्वजनिक विद्युत वाहन चार्जिंग

## हितगुज



**लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

स्टेशन उभारण्यात आली आहे. महावितरणने आपल्या प्रकाशगड या मुख्यालयातही चार्जिंग सुविधा उभारली आहे. नवीकरणीय ऊर्जेचा वापर करून वाहने चार्जिंग करण्यासाठीचा प्रायोगिक प्रकल्पही महावितरणने उभारला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या राज्य सरकारच्या धोरणामुळे महावितरणची जबाबदारी वाढली आहे. राज्य सरकारने महावितरणवर सोपविलेल्या जबाबदारीबद्दल मी शासनाचा आभारी आहे. मला खात्री आहे की, महावितरणचे अभियंते ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडतील.

विद्युत वाहन चार्जिंगची सुविधा सहज उपलब्ध असणे ही विद्युत वाहनांच्या वापराच्या बाबतीत सर्वात महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी विजेची मागणी वाढणार आहे. चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी विद्युत वितरणच्या पायाभूत सुविधा विकसित कराव्या लागतील. मला सांगताना आनंद वाटतो की, राज्याची भविष्यकाळातील विजेची गरज ध्यानात घेऊन महावितरणने यापूर्वीच ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार केला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी चालू आहे.

आर्थिक प्रगतीमुळे २०३० पर्यंत महाराष्ट्र राज्याची विजेची गरज युरोपातील जर्मनी, स्पेन, इटली अशा प्रगत देशांपेक्षा जास्त असेल. हे ध्यानात घेऊन मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ३.३ लाख कोटी रुपये गुंतवणुकीचा राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. भविष्यातील आव्हाने ध्यानात घेऊन राज्याची सध्याची ४२ हजार मेगावॅटची क्षमता २०३० साली ८१ हजार मेगावॅटवर नेण्यासाठीचा हा आराखडा आहे. राज्याची विजेची गरज किती वाढेल याचा अचूक अंदाज करून महावितरणने अत्यंत किफायतशीर दरात वीज खरेदीचे करार केले आहेत. राज्याची ऊर्जा क्षमता वाढविताना नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे पर्यावरण रक्षणासोबतच किफायतशीर दरात वीज उपलब्ध झाल्यामुळे विजेचा खर्चही मोठ्या प्रमाणात कमी होईल. विजेच्या उपलब्धतेबाबत महावितरणने योग्य नियोजन केल्यामुळे विद्युत वाहनांची संख्या वाढली तरी त्यामुळे जी विजेची मागणी वाढेल ती सहज पूर्ण केली जाईल, याची मला खात्री आहे.

### विद्युत वाहनांची वाढती लोकप्रियता

राज्य सरकारने नवे विद्युत वाहन धोरण जाहीर केल्यानंतर लगेचच अक्षय तृतियेला वाहनखरेदीमध्ये लोकांनी विद्युत वाहनांना अधिक पसंती दिल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. विद्युत वाहने चालविण्यास सोपी असतात, त्यांच्यामुळे ध्वनी प्रदूषण होत नाही, त्यांच्यामध्ये पारंपरिक वाहनांपेक्षा कमी पार्ट असतात आणि या वाहनांचा देखभालीचा खर्चही कमी असतो. मुख्य म्हणजे वाहनाच्या प्रती किलोमीटर इंधन खर्चाचा विचार केला तर पेट्रोल अथवा डिझेलपेक्षा विद्युत वाहन खूपच स्वस्त पडते. यामुळे जगभर विद्युत वाहनांना वाढती पसंती मिळत आहे. देशामध्ये विद्युत वाहनांच्या वापराच्या बाबतीत महाराष्ट्र हे आघाडीचे राज्य आहे. राज्य सरकारच्या प्रोत्साहनामुळे आगामी काळात विजेच्या वाहनांचा वापर वाढत जाईल.

मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काळाची पावले ओळखून महाराष्ट्र राज्याला अग्रेसर ठेवण्यासाठी ऊर्जा क्षेत्रात अनेक प्रभावी पावले उचलली आहेत. शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होण्यासाठी महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना मा.मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात अंमलात येत आहे. कृषी क्षेत्राचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. आता नव्या विद्युत वाहन धोरणामुळे महाराष्ट्र राज्य वाहतुकीसाठी विजेचा वापर करण्यातही आघाडीवर राहील. एका महत्त्वाच्या स्थित्यंतरात महावितरणला जबाबदारीची भूमिका मिळाली आहे, ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.

# वसुलीचे यश, सर्वांचे अभिनंदन !

**महावितरणचे अध्यक्ष** तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यंदा विक्रम केला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महावितरणने १,३४,६१२ कोटी रुपयांची वीजबिलांची वसुली केली असून तिचे प्रमाण वार्षिक वीजबिल मागणीच्या ९९.८० टक्के एवढे आहे. रकमेचा विचार केला तर हा आतापर्यंतचा सर्वात मोठा आकडा आहे. त्याचबरोबर या आर्थिक वर्षात महावितरणने कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) थकित बिलांच्या वसुलीसाठी राबविलेल्या अभय योजनेच्या अंतर्गत २९८ कोटी रुपयांची वसुली केली आहे. हा सुद्धा एक विक्रमच आहे. वसुलीच्या या यशाबद्दल मी बिलिंग विभागातील कार्यकारी संचालक परेश भागवत यांची टीम तसेच क्षेत्रीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो.

वसुलीच्या बाबतीत सर्वच विभागांनी व त्यांच्या अंतर्गत परिमंडलांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. एकत्रित व एकसंधपणे काम केल्यास आपण उत्तुंग पर्वतही हलवू शकतो, या उक्ती प्रमाणे सर्वांच्या प्रयत्नांनी हे यश मिळाले आहे. या आर्थिक वर्षात कोकण विभाग १०१.६६ टक्के वसुली करून पहिल्या क्रमांकावर आहे. त्या खालोखाल नागपूर विभाग (९९.४२ टक्के), पुणे विभाग (९८.८१ टक्के) आणि छत्रपती संभाजीनगर विभाग (९६.६२ टक्के) यांचा क्रम लागतो. क्रमवारीत विभाग पुढे मागे असले तरी त्यांच्यात तीव्र स्पर्धा झाल्याचे ध्यानात येईल. यात भांडूप परिमंडल १०६ टक्के ( २४०६४ कोटी रुपये) वसुली करून प्रथम, कोकण परिमंडल १०२ टक्के (१७५६ कोटी रुपये) द्वितीय आणि कल्याण परिमंडल १०२ टक्के ( १३,४३० कोटी ) तिसऱ्या क्रमांकावर राहिले. अन्य परिमंडलांमध्ये वीजबिल वसुलीची टक्केवारी यापेक्षा कमी असली तरी त्यांनी त्यांच्या उद्दिष्टाच्या प्रमाणात खूपच चांगली कामगिरी केली आहे.

### कल्पक उपायांचा लाभ

वीजबिल वसुलीसाठी आपण पारंपरिक पद्धतीने पाठपुरावा करत मुख्य अभियंत्यापासून फिल्डवरील लाईनमनपर्यंत सर्वांनी यासाठी मनापासून प्रयत्न केले, त्याचा या यशात मोठा वाटा आहेच. परंतु त्यासोबत आपण काही वेगळे कल्पक उपाय केले त्याचाही उपयोग हे वसुलीतील यश मिळण्यासाठी झाला. उच्चदाब ग्राहक किंवा मोठे बिल भरणारे (पीसी झिरोमधील) एलटी ग्राहक यांच्या बिलाच्या तारखा महिन्याच्या ५ तारखेपर्यंत निश्चित केल्यामुळे कंपनीचा कॅश फ्लो सुधारला. फिल्ड मधील अधिकारी व कर्मचारी यांनी मीटर वाचकाने दिलेल्या मीटरच्या फोटोची पडताळणी करण्यासाठी पुढाकार घेतला आणि १०० टक्के पडताळणीसाठी काम केले. परिणामी ग्राहकांना अचूक बिले मिळाल्याने त्यांना बिले भरण्यास प्रोत्साहन मिळाले.

महावितरणच्या मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्र (सेंट्रलाईज्ड कस्टमर केअर सेंटर) व्यवस्थेचा बिलवसुली करिता मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात आला. या केंद्रांतील ३०० पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांनी, ज्या ग्राहकांचे वीज बिल थकीत आहे, अशा ग्राहकांना संपर्क करून बिल भरण्याकरिता पाठपुरावा केला. यामुळे बिलांचा अधिक भरणा होण्यास खूप मदत झाली. उच्चदाब वीज ग्राहकांसाठी इंटर ॲक्टीव्ह बिलिंग प्रोफॉर्मा उपलब्ध करून देण्यात आला, ज्याचा त्यांना खूपच उपयोग झाला. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अनुभवावर आधारित उपाय आणि नव्याने राबविलेल्या काही कल्पना यामुळे यंदा विक्रमी वीजबिल वसुली झाली.

**अरविंद भादिकर**
संचालक (संचालन)

महावितरणने कंपोझिट बिलिंग संकल्पना म्हणजे ज्या कंपनीच्या किंवा संस्थेच्या अनेक शाखा कार्यरत आहेत व त्यांना स्वतंत्रपणे बिले जातात त्यांची एकत्रित माहिती संबंधित कंपनी किंवा संस्थेच्या मुख्यालयाला ऑनलाईन उपलब्ध केली जाते. जेणेकरून त्या मुख्यालयाला आपल्या अंतर्गत विविध शाखांची बिले किती याची माहिती मिळते व त्यांना थेट बिलेही भरता येतात. सध्या या सुविधेचा लाभ घेणाऱ्यांच्या यादीमध्ये प्रामुख्याने मोबाईल टॉवर्स कंपन्या, जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या शाळा, खडकी कँटोन्मेंट, औरंगाबाद स्मार्ट सिटी, नाबार्ड, महापारेषण इत्यादींचा समावेश आहे. कंपोझिट बिलिंग ही ग्राहक आणि महावितरण या दोघांसाठी उपयुक्त व्यवस्था असून तिचा लाभ अधिकाधिक सरकारी खात्यांनी घ्यावा, यासाठी आपले प्रयत्न चालू आहेत.

### अभय योजनेचे ऐतिहासिक यश

अभय योजनेला यावेळी ऐतिहासिक यश मिळाले. यामध्ये पीडी ग्राहकांकडून २०० कोटी रुपये वसुलीचे उद्दिष्ट निश्चित केले होते परंतु प्रत्यक्षात सुमारे ३०० कोटी रुपये वसूल झाले. या यशाबद्दल सर्वांचे अभिनंदन.

अभय योजना राबविताना यावेळी आपण नेहेमीपेक्षा वेगळ्या उपायांचा अवलंब केला. थकबाकी असलेल्या ग्राहकांची कॉम्प्युटरचा वापर करून क्रमवारी लावली आणि नेमक्या कोणत्या ग्राहकांकडे पाठपुरावा करायचा हे निश्चित केले. त्यानुसार विविध कार्यालयांना टार्गेट दिली. मोघम टार्गेट देण्याऐवजी नेमकी टार्गेट दिल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांचे काम सोपे झाले व त्यांना दिशा मिळाली. परिणामी त्यांनी चांगली वसुली केली. या पद्धतीमध्ये कोणी काम केले व कोण कमी पडले हे नेमकेपणाने स्पष्ट होत असल्याने काम करणाऱ्यांना अधिक उत्साह वाटला. या योजनेत जी नेमक्या टार्गेटची यादी विविध कार्यालयांना देण्यात आली होती त्याचा पाठपुरावा मुख्यालयातून नियमितपणे होत होता, हे विशेष.

यावेळी अभय योजनेची जाहिरात वृत्तपत्रांमार्फत करण्याबरोबरच सोशल मीडियाचा वापर करणे, स्थानिक चॅनेल्सवर छोट्या फिल्मचा वापर करणे आणि बसगाड्यांवर जाहिरात लावणे या उपायांचाही वापर केला. त्यामुळे दूरदूरच्या गावांपर्यंतही संदेश पोहोचला आणि ग्राहकांना योजनेचा लाभ घेणे शक्य झाले. ज्या ग्राहकांना योजनेचा लाभ घ्यायचा आहे, त्यांच्या तक्रारींचे अथवा प्रलंबित केसेसचे तातडीने निरसन करण्यात आले. ऑनलाईन सुविधा उपलब्ध केल्यामुळे ग्राहकांना घरात बसूनच अभय योजनेचा लाभ घेता आला. त्यामुळेही योजनेच्या यशाला हातभार लागला.

### मार्चची वाट पाहू नका

महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यंदा नियमित बिल वसुली आणि अभय योजना या दोन्ही बाबतीत चांगले काम केले आहे. पण मला सर्वांना एक सांगायचे आहे की, मार्च महिना म्हणजे आर्थिक वर्ष अखेरची वाट पाहू नये. जसे मेरिटमध्ये येणारा विद्यार्थी शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसापासून अभ्यास करतो त्याच प्रकारे आपणही प्रत्येक महिना म्हणजे मार्च एंडिंग असे समजून त्या त्या महिन्यातच बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करावे. त्यामुळे आपले काम हलके होईल तसेच ग्राहकांनाही त्या त्या वेळी मर्यादित बिल असल्याने ते भरणेही सोपे होईल.

आपण सर्वांनी हे ध्यानात घेतले पाहिजे की, महावितरण करत असलेली वीजबिल वसुली ही राज्याचा वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. महावितरणच्या महसुलातील ८५ टक्के रक्कम ही वीजखरेदी आणि उपकेंद्रापर्यंत वीजवहन यासाठी खर्च होते. राज्यातील लोकांचे जीवनमान सुखाचे होण्यासाठी आणि आर्थिक व्यवहार उत्तम चालण्यासाठी वीजपुरवठा ही अत्यावश्यक गरज झाली आहे. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमित वीजबिल वसुली केली तरच वीजखरेदी आणि वीजवहन शक्य आहे. वीजबिल वसुली हा एकूण राज्याच्या हितासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे, याची आपण सर्वांनी नोंद घेणे गरजेचे आहे.

# २०२६ पर्यंत ८० टक्के शेतकऱ्यांना मिळणार दिवसा १२ तास मोफत वीज

## मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



नेरी (मिर्झापूर) येथील प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत विकसित सौरग्रामचे लोकार्पण करतांना मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समवेत मान्यवर

**शेतकऱ्यांच्या** हितासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत सौरऊर्जेचा वीजपुरवठा केला जाईल,अशी घोषणा मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आर्वी येथील विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्यात केली. शेतीसाठी पाणी आणि वीज उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्धा जिल्ह्यातील नेरी (मिर्झापूर) येथील प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत विकसित सौरग्रामचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी गृह (ग्रामीण) राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार अमर काळे यांच्यासह आमदार दादाराव केचे, समीर कुणावर, सुमीत वानखेडे, राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस व सुरेश वाघमारे, जिल्हाधिकारी वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सरीता गाखरे, सुनील गफाट, मुख्य अभियंता दिलीप दोडके, मंडलाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी उपस्थित होते.

या गावात आता नागरिकांना पूर्णपणे मोफत वीज मिळणार आहे. राज्यातील ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना सौरऊर्जेच्या माध्यमातून मोफत वीज उपलब्ध करून दिली जाईल, असे आश्वासन मा.मुख्यमंत्र्यांनी दिले. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार, दिवसा १२ तास वीजपुरवठा करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे डिसेंबर २०२६ पर्यंत ८० टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत सौरऊर्जा मिळणार आहे, असे मा.मुख्यमंत्री म्हणाले.

२०२५ ते २०३० या काळात राज्यातील वीज ग्राहकांच्या बिलात घट करण्यासाठी राज्य वीज नियामक आयोगाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सौरऊर्जेमुळे वीज दर कमी करण्याचे नियोजन असून, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे, असे मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतीच्या सिंचनासाठी १० अश्वशक्ती पर्यंतच्या सौर कृषी पंपांना परवानगी दिली जाईल. तसेच, निम्न वर्धा प्रकल्पावर तरंगता सौर प्रकल्प उभारण्यात येणार असून, त्यातून ५०० मेगावॅट वीज उपलब्ध होईल, अशी माहिती मा.मुख्यमंत्र्यांनी दिली. प्रधानमंत्री आवास योजनेतील गरीब कुटुंबांच्या घरांवर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यांनाही वीज बिलातून मुक्त केले जाईल,असे मा.मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.




नेरी (मिर्झापूर) येथील प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत विकसित सौरग्रामचे लोकार्पण प्रसंगी ग्रामस्थ

# वर्धा मंडलातील तीन उपकेंद्रांना आयएसओ मानांकन

**नागपूर परिमंडलाच्या** वर्धा मंडलातील ३३/११ केव्ही आर्वी, पिंपळगाव व हिंगणी उपकेंद्रांनी गुणवत्ता आणि सुरक्षिततेच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत आयएसओ मानांकन मिळविले आहे. या तीनही उपकेंद्रांना आएसओ ९००१:२०१५ (गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली) आणि आयएसओ ४५००१:२०१८ (व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली) या दोन्ही मानांकनांनी गौरवण्यात आले आहे.

अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांच्या मार्गदर्शनात कार्यकारी अभियंता हेमंत पावडे (हिंगणघाट), स्वप्निल गोतमारे (वर्धा), प्रशांत गायकवाड (आर्वी) व कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रदीप घोरुडे (वर्धा मंडल) यांच्यासह अधिकारी – कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रादेशिक संचालक परेश भागवत व मुख्य अभियंता दिलीप दोडके (नागपूर) यांनी अभिनंदन केले आहे.

# कामगार दिनी उत्कृष्ट तांत्रिक कर्मचारी पुरस्काराने गौरव

**राज्यातील** सर्व परिमंडलस्तरावर १ मे महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण करण्यात आले. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून सन २०२४-२५ मध्ये उत्कृष्ट ग्राहकसेवा, सुरळीत वीजपुरवठा, वीजवाहिन्या व उपकेंद्रांची विनाअपघात तांत्रिक देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या यंत्रचालक व तंत्रज्ञ संवर्गातील कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट तांत्रिक कर्मचारी पुरस्काराने गौरविण्यात आले.



**चंद्रपूर परिमंडल :** चंद्रपूर परिमंडलात मुख्य अभियंता हरिश गजबे यांच्या हस्ते ३६ तांत्रिक कर्मचाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी अधीक्षक अभियंता संध्या चिवंडे, अधीक्षक अभियंता (पायाभुत आराखडा) रमेश सानप, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुशिल विखार, कार्यकारी अभियंता चंद्रशेखर दारव्हेकर (चंद्रपूर), सत्यदेव पेगल्लापट्टी (बल्लारशा), योगेंद्र निचत( चाचणी विभाग) वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) राकेश बोरीवार यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**पुणे परिमंडल :** वीजक्षेत्र हे अतिशय धकाधकीचे आहे. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना अविश्रांत सेवा देताना कायम युद्धपातळीवर कार्यरत राहावे लागते. गेल्या वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ५९ कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट तांत्रिक कर्मचारी म्हणून पुरस्कार मिळाला आहे. मात्र या पुरस्कारामध्ये त्यांच्या कुटुंबियांचाही मोठा वाटा आहे. याची जाणिव ठेवून उत्कृष्ट कर्मचाऱ्यांनी कुटुंबियांसह हा पुरस्कार स्वीकारला याचा मनापासून आनंद आहे, असे गौरवोद्गार प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी काढले.

पुणे परिमंडलातील १२ यंत्रचालक व ४७ तंत्रज्ञ संवर्गातील कर्मचाऱ्यांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सहकुटुंब गौरविण्यात आले. यावेळी मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे, अधीक्षक अभियंता सर्वश्री सिंहाजीराव गायकवाड, युवराज जरग, संजीव नेहते, रवींद्र बुंदेले , उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भुपेंद्र वाघमारे यांची उपस्थिती होती.

**रत्नागिरी परिमंडल :** रत्नागिरी परिमंडलात मुख्य अभियंता अनिल डोये यांच्या हस्ते ३१ वीज कर्मचाऱ्यांना 'उत्कृष्ट तांत्रिक कर्मचारी' पुरस्काराने गौरवण्यात आले. डोये यांनी कर्मचाऱ्यांना कालसुसंगत नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. यावेळी अधीक्षक अभियंता वैभवकुमार पाथोडे, कार्यकारी अभियंता राजश्री मोरे, नितीन पळसुलेदेसाई, दत्तात्रय साळी, वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) मिलिंद कानडे उपस्थित होते. प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्र). राजेंद्र जाधव यांनी केले.



**गोंदिया परिमंडल :** महावितरणची संपूर्ण यंत्रणा, सतर्कता व कार्यकुशलता याच तत्त्वावर आधारित असल्यामुळे वीज क्षेत्रातील झालेली कोणतीही चूक आयुष्याची शेवटची चूक ठरू शकते.

२४ तास सर्व प्रकारच्या सतर्कता बाळगणे हे प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याचेही आद्य कर्तव्य असले पाहिजे, असे उद्गार मुख्य अभियंता सुहास रंगारी यांनी काढले. मुख्य अभियंता रंगारी यांच्या हस्ते तांत्रिक कर्मचाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी अधीक्षक अभियंता धम्मदीप फुलझेले, कार्यकारी अभियंता आनंद जैन (गोंदिया), सहाय्यक महाव्यवस्थापक असित ढाकणेकर, प्रणाली विश्लेषक विलास फुलझेले व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत चवरे उपस्थित होते.



**बारामती परिमंडल :** बारामती परिमंडलात मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांच्या हस्ते १३ यंत्रचालक व ६१ तंत्रज्ञ संवर्गातील कर्मचाऱ्यांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला.

यावेळी अधीक्षक अभियंता दिपक लहामगे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) धैर्यशील गायकवाड, कार्यकारी अभियंते संजय गायकवाड, म्हसू मिसाळ, संजय सोनवलकर, विशाल शिवतरे व प्रमोद रागीट, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचलन रोहित राख यांनी केले.



**लातूर परिमंडल :** लातूर परिमंडलात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते ४६ तांत्रिक कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी अधीक्षक अभियंता मदन सांगळे, सहाय्यक महाव्यवस्थापक चेतन वाघ, कार्यकारी अभियंता गणेश सामसे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर तर सूत्रसंचालन प्रमोद गरड यांनी केले.



**नागपूर परिमंडल :** नागपूर परिमंडलात मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते ६३ तांत्रिक कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता अमित परांजपे, संजय वाकडे, कार्यकारी अभियंता हेमराज ढोके, समीर टेकाडे, चंदन तल्लरवार, समीर शेंद्रे, राजेश घाटोळे, महाव्यवस्थापक (विधी व लेखा) अतुल राऊत, उपविधी अधिकारी सुनिल उपाध्ये, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने यांनी केले.




**कल्याण परिमंडल :** कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या हस्ते ५० तांत्रिक कर्मचाऱ्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी तांत्रिक कर्मचारी हे महावितरणच्या प्रगतीचे शिल्पकार असल्याचे नमूद करत स्वत:ला सिद्ध करण्याची क्षमता कायम जोपासण्याचे आवाहन जगदाळे यांनी कर्मचाऱ्यांना केले. यावेळी अधीक्षक अभियंता दीपक पाटील, महेश अचिंनमाने, मोहन काळोगे, सहायक महाव्यवस्थापक सुशिल पावसकर, कार्यकारी अभियंता नितीन काळे, मिलींद चौधरी, सुनिल वनमोरे उपस्थित होते. सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता श्रीमती स्मिता काळे तर आभारप्रदर्शन वरिष्ठ व्यवस्थापक निलेश भवर यांनी केले.



**नाशिक परिमंडल :** नाशिक परिमंडलात मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या हस्ते ७१ तांत्रिक कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक महेश बुरंगे, कार्यकारी अभियंता योगेश निकम, राजाराम डोंगरे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी प्रमोद राजेभोसले यांनी केले. सूत्रसंचालन उच्चस्तर लिपिक निलेश वाणी तर आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी विकास आढे यांनी केले.



**कोल्हापूर परिमंडल :** कोल्हापूर परिमंडलात मुख्य अभियंता(प्रभारी) गणपत लटपटे यांच्या हस्ते ६४ कर्मचाऱ्यांना 'उत्कृष्ट तांत्रिक कर्मचारी' पुरस्कार देण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) शशिकांत पाटील, कार्यकारी अभियंता सुधाकर जाधव, सुनीलकुमार माने, अभिजीत सिकनीस, प्रशांतकुमार मासाळ, दत्तात्रय भणगे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वरिष्ठ लिपीक उत्तम पाटील यांनी केले.



**अमरावती परिमंडल :** अमरावती परिमंडलात मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या हस्ते ४९ तांत्रिक कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंता प्रदिप पुनसे, कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर, संजय सराटे, राजेश माहुलकर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने,अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना कुलकर्णी म्हणाले की, अत्यावशक सेवा क्षेत्रात काम करतांना कर्मचाऱ्यांनी ग्राहकाप्रती संवेदनशील असणे गरजेचे आहे. प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक अधिकारी मधुसूदन मराठे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रविण वाट यांनी केले.



**जळगाव परिमंडल :** जळगाव परिमंडलात मुख्य अभियंता आय.ए.मुलाणी यांच्या हस्ते यंत्रचालक व तंत्रज्ञ संवर्गातील कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. कर्मचाऱ्यांनी डिजिटल पध्दतीने सर्व कामे करावी, असे आवाहन मुलाणी यांनी केले. यावेळी अधीक्षक अभियंता अनिल महाजन, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) अशोक केदारे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन सहाय्यक अभियंता रत्ना पाटील यांनी केले.

**छत्रपती संभाजीनगर परिमंडल :** छत्रपती संभाजीनगर परिमंडलात मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते ४२ तांत्रिक कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, संदीप दरवडे, शुभांगी कटकधोंड, बीना सावंत, वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, प्रसाद महातोले, महेश पाटील, शैलेश कलंत्री, भूषण पहूरकर, रमेश वाघचौरे, अविनाश राऊत यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी केले.

# राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणच्या खेळाडूंची बाजी



विजेत्या संघासमवेत महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) अभय हरणे, मुख्य अभियंता स्वप्निल काटकर, महानिर्मितीचे मुख्य अभियंता संजय कुराडे व मान्यवर.

**अखिल भारतीय** विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४६ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणच्या राज्यभरातील खेळाडूंनी ॲथलेटिक्स, कॅरम व हॉलिबॉल स्पर्धेत १६ सुवर्ण, ९ रौप्य व ८ कांस्य अशी ३३ पदके जिंकली. महिला गटाने ॲथलेटिक्स व कॅरमचे तर पुरूष गटाने कॅरमचे विजेतेपद पटकावले. या राष्ट्रीय स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू म्हणून हिमाचल प्रदेशच्या सुरेश कुमार यांना तर हॉलीबॉल बेस्ट स्मॅशर म्हणून महावितरणच्या समीर अली शेख यांना गौरविण्यात आले. देशातील विविध विद्युत कंपन्यांच्या तीन दिवशीय राष्ट्रीय स्पर्धा कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर पार पडल्या.

विजेत्या खेळाडूंना महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) अभय हरणे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. यावेळी मुख्य अभियंता स्वप्निल काटकर, महानिर्मितीचे मुख्य अभियंता संजय कुराडे , आयोजन समितीच्या अध्यक्षा व महापारेषणच्या मुख्य अभियंता शिल्पा कुंभार, अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाचे उपाध्यक्ष भारत पाटील, खजीनदार ललित गायकवाड यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन महेंद्र कुलकर्णी व संजय पाटील यांनी केले. या स्पर्धेच्या आयोजनासाठी समितीचे सचिव महावितरणचे शिरीष काटकर, महानिर्मितीचे प्रसाद निकम व महापारेषणचे प्रांजल कांबळे यांच्यासह विविध समितीचे प्रमुख व सदस्यांनी पुढाकार घेतला.

महावितरणच्या विजेत्या खेळाडूंची नावे – वैयक्तिक गट – १०० मीटर पुरुष– साईनाथ मसने (सुवर्ण), १०० मीटर महिला– प्रिया पाटील (सुवर्ण), २०० पुरुष गुलाब वसावे (सुवर्ण), २०० मीटर महिला– प्रिया पाटील (सुवर्ण), श्वेतांबरी अंबादे (कांस्य), ४०० मीटर पुरुष – चंद्रशेखर हुमणे (रौप्य), ४०० मीटर महिला – श्वेतांबरी अंबादे (सुवर्ण), ८०० मीटर पुरुष – वैभव माने (रौप्य), परेश चौधरी (कांस्य), ८०० मीटर महिला – संजना शेजल (रौप्य), रागिणी बेले (कांस्य), १५०० मीटर महिला – रागिणी बेले (कांस्य), ५००० मीटर पुरुष प्रतिक वायकर (सुवर्ण), सुनिल कोकणे (कांस्य), लांब उडी महिला – माया येलवंडे (सुवर्ण), मेघा जुंगरे (कांस्य), उंच उडी पुरुष सतिश पाटील (कांस्य), उंच उडी महिला– सोनाली मोरे (रौप्य), गोळा फेक महिला – पुजा ऐनापूरे (सुवर्ण), प्रियंका पाटील (रौप्य), थाळी फेक महिला – हिना कुरणे (सुवर्ण), ज्योती कांबळे (रौप्य), भाला फेक पुरुष – अमित पाटील (कांस्य), भाला फेक महिला – अश्विनी जाधव (सुवर्ण), ११० मीटर अडथळा शर्यत पुरुष– साईनाथ मसने (कांस्य), ४०० मीटर अडथळा शर्यत पुरुष – गुलाबसिंह वसावे (सुवर्ण), ट्रीपल जंप– शेख झाकिर अली (कांस्य), कॅरम ओपन पुरुष – अनंत गायत्री (सुवर्ण), अनिकेत भैसारे (कांस्य), कॅरम ओपन महिला –पुष्पलता हेडाऊ (सुवर्ण)

**सांघिक गट** – ४/१०० मीटर रिले पुरुष (रौप्य ) – गुलाबसिंह वसावे, साईनाथ मसने, शुभम निंबाळकर, चंद्रशेखर हुमणे, ४/१०० मीटर रिले महिला (सुवर्ण) प्रिया पाटील, सारिका जाधव, मेघा जुंगळे, श्वेतांबरी अंबादे, ४/४०० मीटर रिले पुरुष (रौप्य) – गुलाबसिंह वसावे, साईनाथ मसने, शुभम निंबाळकर, चंद्रशेखर हुमणे, हॉलीबॉल पुरुष (कांस्य), कॅरम पुरुष (सुवर्ण), कॅरम महिला (सुवर्ण) पदक पटकावले.

# मेळघाटातील ३५ गावांना सुरळीत व दर्जेदार वीज पुरवठा



**अमरावती** परिमंडलातील धारणी उपविभागातील ३३/११ केव्ही गोंडवाडी उपकेंद्रांतील ५ एमव्हीए रोहित्राची क्षमता वाढ करून १० एमव्हीए करण्यात आली आहे. सदरील उपकेंद्र रोहित्र नुकतेच कार्यान्वित करण्यात आले. ३३/११ केव्ही कढाव उपकेंद्रातील रोहित्रांची क्षमता वाढ करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या क्षमता वाढीमुळे उपकेंद्र परिसरातील ३० ते ३५ गावांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. अचलपूर विभागाचे कार्यकारी अभियंता संजय कुटे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (चाचणी) सुधीर केळकर, धारणीचे उपकार्यकारी अभियंता श्याम येनगंटीवार यांनी कामकाज पाहिले.

## नूतन संचालकांचे अभिनंदन !







राजेंद्र पवार
संचालक (मानव संसाधन)

सचिन तालेवार
संचालक (प्रकल्प)

## एकलहरे प्रशिक्षण केंद्राचा जलसंवर्धनाचा उपक्रम

**एकलहरे** येथील राज्यस्तरीय प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राने जलसंवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. प्रशिक्षण केंद्रातील सांडपाण्याचे शुध्दीकरण्यासाठी प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पातील पाण्याचा वापर परिसरातील बागेतील फळ-फुल झाडांसाठी करण्यात येतो आहे. नुकतेच संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर यांचे हस्ते करण्यात आले. या स्वयंचलित सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाची शुध्दीकरण क्षमता प्रतिदिन ८ हजार लिटर इतकी आहे. साधारणपणे वार्षिक १० लक्ष लिटर पाण्याची बचत होण्यास मदत होणार आहे. संचालक भादिकर यांनी या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक केले.

याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, मुख्य अभियंता सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रय बनसोडे यांच्या मार्गदर्शनात कार्यकारी अभियंता नरेंद्र सोनवणे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती संगिता गजबे, सहायक अभियंता गिरीष मोरे व रुपेश खरपकार यांनी परिश्रम घेतले. में. जलकॉन्सर्व्ह टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांचे मार्फत प्रकल्प उभारणी करण्यात आली आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नागपूरात अभिवादन



▸▸ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन प्रसंगी अधिकारी व कर्मचारी.

**संविधानाचे** शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त नागपूर परिमंडल कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मुख्य अभियंता दिलीप दोडके (नागपूर) व हरीश गजबे (चंद्रपूर) यांनी अभिवादन केले. याप्रसंगी महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता अंकूर जोशी, अधीक्षक अभियंता राकेश जनबंधू, अमित परांजपे, मंगेश वैद्य, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक (विधी) डॉ. अविनाश आचार्य यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले. गड्डीगोदाम येथील नागपूर शहर मंडल कार्यालय परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले.

# प्रशिक्षणाचा उपयोग महावितरण आणि ग्राहक सेवेसाठी करा

## संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर यांचे आवाहन

## राज्यभरातील अधीक्षक अभियंता यांचे प्रशिक्षण



▸▸ प्रशिक्षणार्थी अधीक्षक अभियंता यांच्यासमवेत संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर, मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रय बनसोडे, मुख्य अभियंता सुंदर लटपटे व मान्यवर.

**प्रशिक्षण केंद्राच्या** माध्यमातून प्राप्त नवनवीन माहितीचा व ज्ञानाचा उपयोग महावितरण व ग्राहक सेवा गतिमान करण्यासाठी करा, असे आवाहन संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर यांनी केले. नाशिक येथील ऊर्जा व्यवस्थापन आणि प्रशिक्षण संस्थेत वरिष्ठ स्तर व्यवस्थापन विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यातील अधीक्षक अभियंता यांचे नेतृत्व व्यवस्थापन कौशल्य संदर्भात तीन दिवशीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, मुख्य अभियंता सुंदर लटपटे उपस्थित होते.



▸▸ प्रशिक्षणार्थी अधीक्षक अभियंता यांच्यासमवेत कार्यकारी संचालक (मानव संसाधन) परेश भागवत व मान्यवर.

पुढे बोलताना भादिकर म्हणाले की, सर्वच प्रशिक्षणार्थींनी संवाद, नेतृत्व आणि वाटाघाटी कौशल्य विकसित करण्याची गरज असून कंपनीमध्ये गतिमान बदल घडविण्यासाठी आपला सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. दैनंदिन कार्यात येणाऱ्या अडचणी व समस्या ओळखून त्यावर उपाय व उत्तरे शोधण्याचे आवाहनही त्यांनी केले. नाविन्यपूर्ण कल्पनांच्या माध्यमातून महावितरणचा नावलौकिक आणखी वाढविण्याचे आवाहन केले. प्रशिक्षण समारोपप्रसंगी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) परेश भागवत यांनी प्रशिक्षणाचा जीवनात व सेवाकाळात कसा वापर करावा याबद्दल मार्गदर्शन केले.

# चंद्रपूर परिमंडलाचे रंग बावरी विजेते



नाट्यकुंभ-२०२५ या स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार समवेत प्रादेशिक संचालक परेश भागवत व मान्यवर.



विजेत्या चंद्रपूर परिमंडलाला पारितोषिक प्रदान करताना संचालक (संचालन) अरविंद भादिकर, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे व मान्यवर.

**नागपूर प्रादेशिक** आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धा नाट्यकुंभ-२०२५ मध्ये चंद्रपूर परिमंडलाच्या श्रीपाद जोशी लिखित रंग बावरी या नाटकाने उत्कृष्ट अभिनयासह विजेतेपदाचा मान पटकावला. अकोला परिमंडलाचे डॉ. चंद्रकांत शिंदे लिखित सिकॅरिअस हे नाटक उपविजेते ठरले.या स्पर्धेतील विजेत्या कलाकारांना संचालक (संचालन) अरविंद भादिकर व संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी स्पर्धेचे अध्यक्ष तथा प्रादेशिक संचालक परेश भागवत, मुख्य अभियंता सुहास रंगारी, दिलीप दोडके, ज्ञानेश कुलकर्णी, राजेश नाईक व स्वागताध्यक्ष हरिश गजबे यांच्यासह नाट्य परिक्षक विनोद दुर्गेपुरोहित, जयदेव सोमनाथे, ॲड. चैताली बोरकुटे यांची उपस्थिती होती.

या सोहळ्याप्रसंगी बोलताना भादिकर यांनी नाट्य कलाकारांचे कौतुक केले आणि स्पर्धेनंतरही त्यांनी एकमेकांशी संवाद कायम ठेवण्याचे आवाहन केले.

दोन दिवशीय नाट्यकुंभ-२०२५ चे उद्घाटन संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते झाले. या सोहळ्याप्रसंगी बोलताना पवार यांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामातील अनमोल अनुभवांना नाट्यकृतींच्या माध्यमातून समाजासमोर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. नाट्यकुंभ सारख्या स्पर्धांमुळे या कलाकारांना त्यांची प्रतिभा सादर करण्याची संधी मिळते. यासोबतच अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सुसंवाद वाढतो आणि सांघिक भावना अधिक दृढ होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. विदर्भातील नाट्य परंपरेचाही विशेष उल्लेखही केला. या स्पर्धेत नागपूर परिमंडलाने प्रदीप फाटक लिखित ये रे घना तर गोंदिया परिमंडलाने अतुल साळवे लिखित दि ॲनॉनिमस ही नाटके सादर केली.

**स्पर्धेचा अंतिम निकाल :** सर्वोत्तम नाटक: प्रथम: रंग बावरी (चंद्रपूर परिमंडल),द्वितीय: सिकॅरिअस (अकोला परिमंडल)

**दिग्दर्शन :** प्रथम: संध्या चिवंडे (रंग बावरी), द्वितीय: नितीन नांदुरकर (सिकॅरिअस), **अभिनय (पुरुष):** प्रथम: गणेश राणे (रघुपती - सिकॅरिअस), द्वितीय: सुमित खोरगडे (सुभाष - ये रे घना),**अभिनय (स्त्री):** प्रथम: रोहिणी ठाकरे (नेहा - रंग बावरी),द्वितीय: स्नेहांजली तुंबडे (स्मिता - ये रे घना),

**नेपथ्य:** प्रथम: रमेश सानप (रंग बावरी), द्वितीय: गजानन जैवाल (दि ॲनॉनिमस), **प्रकाश योजना:** प्रथम: प्रकाश खांडेकर (रंग बावरी),द्वितीय: विवेकानंद वाघ (सिकॅरिअस), **पार्श्वसंगीत:** प्रथम: राकेश बोरोवार (रंग बावरी), द्वितीय: योगेश सोनुने (सिकॅरिअस), **रंगभूषा-वेशभूषा:** प्रथम: पौर्णिमा कदम (सिकॅरिअस), द्वितीय: आनंद जैन (दि ॲनॉनिमस)

**उत्तेजनार्थ पारितोषिक:** सायली सायंकार (मेधना - रंग बावरी), अमित पेढेकर (डॉ. विध्वंस - ये रे घना), नावेद शेख (जरासंघ - दि ॲनॉनिमस), संतोष पाटील (इन्स्पेक्टर कश्यप - सिकॅरिअस)

## महाराष्ट्र दिनी प्रकाशगड मुख्यालयात ध्वजारोहण



१ मे महाराष्ट्र दिनी महानिर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांच्या हस्ते प्रकाशगड मुख्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संचालक (संचालन) अरविंद भादिकर, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) धनजंय औंढेकर यांची उपस्थिती होती.

## वर्धा मंडलातील तीन गावे 'सौरग्राम'

**प्रधानमंत्री** सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत वर्धा मंडलातील आर्वी विभागातील नेरी (मिर्झापूर), हिंगणघाट विभागातील चिंचघाट-राठी आणि वर्धा विभागातील रायपूर ही तीन गावे सौरऊर्जेने प्रकाशमय झाली आहेत. चिंचघाट-राठी या गावाने कोणत्याही शासकीय मदतीशिवाय केवळ लोकसहभाग व स्थानिक उद्योगांच्या मदतीने सौरग्राम झाले आहे. नेरी (मिर्झापूर) या गावाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीच्या माध्यमातून राज्यातील सर्वात मोठे सौरग्राम होण्याचा मान मिळवला आहे. रायपूर गावाने स्व-निधीतून सौरग्रामचा मान मिळविला आहे.



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार •उपसंपादक : किशोर खोबरे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)